# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १४/०२/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीविरूध गुन्हा नोंद

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत ०२ कि.मी अंतरावर मौजा दिघोरा भिवापुर येथे दिनांक १३/०२/२०२२ चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ पोर्णिमा कुंभकरण सतीबावणे वय ३७ वर्ष रा. वार्ड क्र. ०२ दिघोरा भिवापुर व आरोपी नामे– भारत अंडेलकर, रा. दिघोरा, भिवापुर हे एकमेकांचे घरा शेजारी राहतात. फिर्यादी हि आपले घरी हजर असता आरोपी हा लाकुड कापण्याची आरी मागण्याकरीता आला असता फिर्यादी हि आरी आणण्याकरीता घरात गेली. त्यादरम्यान आरोपी हा फिर्यादीच्या मागुन घरात गेला व तिची मान पकडुन चाकुने पोटावर, कमरेवर. व मानेवर मारले तेव्हा फिर्यादीने 'तु मला का मारत आहे' असे म्हटले असता आरोपीने 'तु माझ्याशी बोलत नाही, तुला जिवाने मारल्याशिवाय सोडनार नाही' असे म्हणुन फिर्यादीचे हातावर चाकु मारला फिर्यादी ओरडल्याने तो पळुन गेला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ४५२, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीने विषारी औषध प्राषन करून मरण पावला आहे त्यावरून पो.स्टे. भिवापुर येथे मर्ग क्र. ६/२०२२ दाखल आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री प्रकाश चनगोले मो.क्र. ७९७२४४१८४६ हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत ७ कि. मी. अंतरावरील अडयाळ शिवार येथे दिनांक १४/०२/२०२२ चे ०८:३० वा. दरम्यान **भारत चैतु अंडेलकर( मृतक ), वय ४७ वर्ष, रा. वार्ड क्र.०२ दिघोरा भिवापुर ता.भिवापुर जि.नागपुर** याने दि. १३/०२/२०२२ रोजी आपल्या घरा शेजारी राहणारी बाई पोर्णीमा कुभंकरणा सतीबावणे यांचे घरी जावुन आरी मागण्याच्या बाहण्याने तिच्या घरामध्ये जावुन तिच्यावर चाकुने वार करून गंभीर जखमी करून पळुन गेला होता. त्यावरून पो.स्टे. भिवापुर येथे गुन्हा नोंद असुन मृतकचा मुलगा व पोलीसांचे मदतीने त्याचा शोध सुरू होता. मृतक याने अडयाळ येथील शेतामध्ये जावुन विषारी औषध प्राषन केले. त्यावरून मृतकचा मुलगा व पोलीसांनी तात्काळ भिवापुर सरकारी दवाखाण्यात त्यास नेले असता तेथील डॉक्टरनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– योगेश भारत अंडेलकर वय २४ वर्ष रा. वार्ड क्र.०२ दिघोरा भिवापुर ता. भिवापुर जि.नागपुर, वय ५२ वर्ष, रा.शिवनी ता.कुही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. भिवापुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री प्रकाश चनगोले मो.क्र. ७९७२४४१८४६ हे करीत आहे.

# गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत वार्ड नं ०१ हरीहर नगर नगर कांद्री, कन्हान येथे दिनांक १२/०२/२०२२ चे १८.०० वा. ते १९.३० वा. दरम्यान **दुर्गेश दिनेश सिंग ( मृतक ), वय १९ वर्ष रा. वार्ड नं ०१ हरीहर नगर नगर कांद्री, कन्हान** हा नेहमी प्रमाणे घरातील आपले रूममध्ये NIIT च्या अभ्यास करण्याकरीता गेला. सायंकाळी ०६.०० वा. चे सुमारास त्याच्या आईने त्यास जेवण करण्यासाठी आवाज दिला असता त्याने दार उघडला नाही. त्यामुळे त्याचे आईने घराशेजारी राहणारे लोकांचे मदतीने दार तोडले असता मृतक हा वेन्टीलेटर ला दुपटयाने बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दिनेश भोला सिंह, वय ४९ वर्ष रा. वार्ड नं. ०१ हरीहर नगर कांद्री कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार नरेश वरखडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर